# पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

प्रेसनोट

## "पीएमपीएमएल"च्या महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत मॅमोग्राफी व पॅप स्मीअर तपासणी शिबीर

- रोटरी क्लब ऑफ पुणे स्पोर्टस् सिटी, एम-क्युअर फार्मास्युटिकल, समर्थ युवा फाऊंडेशन व दादा गुजर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीराचे आयोजन

रोटरी क्लब ऑफ पुणे स्पोर्टस् सिटी, एम-क्युअर फार्मास्युटिकल, समर्थ युवा फाऊंडेशन व दादा गुजर हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने "पीएमपीएमएल"च्या महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत मॅमोग्राफी व पॅप स्मीअर तपासणी शिबीराचा प्रारंभ "पीएमपीएमएल"च्या मुख्य प्रशासकीय इमारत येथे आज सोमवार दिनांक १४/१०/२०२४ रोजी करण्यात आला. या शिबिराचे उद्घाटन पीएमपीएमएल च्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक मा. श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे यांच्या हस्ते मॅमोग्राफी व पॅप स्मीअर तपासणीसाठी असणाऱ्या मोबाईल व्हॅनची फीत कापून करण्यात आले.

याप्रसंगी पुणे महानगरपालिकेचे उपायुक्त मा. श्री. माधव जगताप, पीएमपीएमएलचे सहव्यवस्थापकीय संचालक मा. श्री. नितीन नार्वेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी मा. सौ. प्रज्ञा पोतदार-पवार, रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट श्री वन श्री वन चे प्रांतपाल मा. श्री. शितल शहा, एम-क्युअर फार्मास्युटिकल लि. सिनिअर मॅनेजर मा. श्री. गिरीश घनवट व सीएसआर को-ऑर्डिनेटर श्री. कौस्तुभ केंजळे, रोटरी क्लब ऑफ पुणे स्पोर्टस् सिटीच्या अध्यक्ष मा. सौ. साधना जोशी, पीएमपीएमएल चे चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (ऑपरेशन) मा. श्री. सतिश गव्हाणे, चिफ ट्रान्सपोर्ट मॅनेजर (कमर्शिअल) मा. श्री. दत्तात्रय झेंडे व समर्थ युवा फाऊंडेशनचे श्री. वैभव बेदरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरच्या शिबिरात पीएमपीएमएल कडील महिला कर्मचाऱ्यांच्या मॅमोग्राफी (स्तनाच्या कर्करोगाशी संबंधित) व पॅप स्मीअर (गर्भाशयाच्या कर्करोगाशी संबंधित) या दोन महत्त्वपूर्ण तपासण्या मोफत करण्यात आल्या. या शिबीराचे आयोजन पीएमपीएमएल च्या डेपोंमध्ये देखील करण्यात येणार आहे.

रोटरी क्लबच्या सौ. अलका रोडे यांनी सूत्रसंचालन केले. पीएमपीएमएल चे कामगार व जनता संपर्क अधिकारी मा. श्री. सतिश गाटे यांनी आभार मानले.

---

**"नोकरदार महिला असोत किंवा गृहिणी असोत, कुटुंबियांकडे लक्ष देताना महिलांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. महिलांनी वेळोवेळी तपासण्या करून घेऊन आरोग्य उत्तम राखले पाहिजे. रोटरी क्लब ऑफ पुणे स्पोर्टस् सिटी, एम-क्युअर फार्मास्युटिकल, समर्थ युवा फाऊंडेशन व दादा गुजर हॉस्पिटल यांनी मॅमोग्राफी व पॅप स्मीअर यासारख्या महत्त्वपूर्ण तपासण्या पीएमपीएमएल कडील महिला कर्मचाऱ्यांसाठी मोफत व थेट कामाच्या ठिकाणी उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते. तसेच पीएमपीएमएल कडील महिला कर्मचाऱ्यांनी या शिबीराचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा."**

**---मा. श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे, अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पीएमपीएमएल**

---

दि. १५/१०/२०२४

मा. संपादक,

दैनिक ..........

यांजकडेस...

महोदय,

वरील प्रेसनोट नागरिकांच्या माहितीसाठी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिद्ध होणेविषयी विनंती आहे.
मा. स. कळावे.

Sd/-

**कामगार व जनता संपर्क अधिकारी**
**पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.**

---